**ठळक बातम्या**

- देशभरात ७ टप्प्यात लोकसभा निवडणूक, ४ जून रोजी निकाल जाहीर होणार
- राज्यात लोकसभेसाठी १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि २० मे रोजी मतदान
- निवडणूक प्रचारात व्यक्तिगत आरोप-प्रत्यारोप आणि लहान मुलांचा वापर टाळण्याचं निवडणूक आयोगाचं आवाहन
- कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भावांतर पद्धतीने लाभ देण्यासाठी राज्य सरकारकडून ४ हजार कोटींची तरतूद

**आणि**

- भारत जोडो न्याय यात्रेसह काँग्रेस नेते राहुल गांधी मुंबईत दाखल

**<><><><><>**

देशाच्या लोकसभा निवडणुकांचं बिगुल आज वाजलं. देशात एकूण ७ टप्प्यात मतदान होणार असून ४ जून रोजी मतमोजणी होईल. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत आज ही घोषणा केली. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधु यावेळी उपस्थित होते. निवडणुकीच्या घोषणेसोबतच आता देशभरात आचारसंहिता लागू झाली आहे.

पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी १०२ मतदारसंघात, दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी ८९ मतदारसंघात, तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी ९४ मतदारसंघात, चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी ९६ मतदारसंघात, पाचव्या टप्प्यात २० मे रोजी ४९ मतदार संघात, सहाव्या टप्प्यात २५ मे रोजी ५७ मतदारसंघात आणि सातव्या

टप्प्यात १ जून रोजी ५७ लोकसभा मतदारसंघात मतदान होईल. राज्यात एकूण ५ टप्प्यात मतदान होणार आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकांच्यावेळी देशात ७ आणि राज्यात ४ टप्प्यात मतदान झालं होतं. देशात लोकसभेच्या ५४३ मतदारसंघात निवडणूक होणार असून त्यातल्या ८४ जागा अनुसूचित जाती आणि ४७ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत.

**<><><><><>**

राज्यात लोकसभेच्या निवडणुकासाठी पहिल्या ५ टप्प्यात मतदान होणार आहे. राज्यात लोकसभेच्या ४८ जागांसाठी मतदान होणार असून त्यातल्या ५ अनुसूचित जाती तर ४ जागा अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधींकडून

**होल्ड व्हाइस कास्ट**

*पहिल्या टप्प्यात विदर्भातल्या रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर आणि चंद्रपूर या ५ लोकसभा मतदारसंघात १९ एप्रिल रोजी मतदान होईल. यासाठी २० मार्चला अधिसूचना जारी केली जाईल आणि २७ मार्चपर्यंत अर्ज भरता येतील. अर्ज मागे घेण्याची मुदत ३० मार्च असेल.*

*दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या विदर्भ आणि मराठवाड्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात आणि अकोला पश्चिम या विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी मतदान होईल. गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळं ही पोटनिवडणूक होणार आहे. यासाठी २८ मार्च रोजी अधिसूचना जारी होऊन ४ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील. ८ एप्रिल ही अर्ज मागे घेण्याची मुदत असेल.*

*तिसऱ्या टप्प्यात ७ मे रोजी राज्यातल्या ११ मतदारसंघात मतदान होईल. त्यात रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या राज्याच्या दक्षिण, पश्चिम भागातल्या आणि कोकणातल्या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यासाठी १२ एप्रिल रोजी अधिसूचना जारी होऊन १९ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील. २२ एप्रिल रोजी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत असेल.*

*चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी राज्यातल्या ११ लोकसभा मतदारसंघात मतदान होईल. त्यात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातल्या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या लोकसभा मतदारसंघांसाठी १८ एप्रिल रोजी अधिसूचना जारी होईल आणि २५ एप्रिलपर्यंत अर्ज भरता येतील. अर्ज मागे घेण्याची मुदत २९ एप्रिलपर्यंत आहे.*

*पाचव्या टप्प्यात राज्यातल्या १३ लोकसभा मतदारसंघात २० मे रोजी मतदान होईल. यात मुंबईतले सर्व मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, पालघर, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. यासाठी २६ एप्रिल ते ३ मे दरम्यान अर्ज भरता येतील. अर्ज मागे घेण्याची मुदत ६ मे पर्यंत आहे.* आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून जीवन भावसार

**<><><><><>**

राजकीय पक्षांनी निवडणूक प्रचार करताना व्यक्तिगत आरोप प्रत्यारोप टाळावेत, असं निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे. निवडणुकांमध्येही कुणी हिंसाचार करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी स्पष्ट केलं. बळ, पैसा,

चुकीची माहिती आणि आचार संहितेचं उल्लंघन हे निवडणूक प्रक्रिया राबवण्याच्या प्रक्रियेत मोठं आव्हान आहे, असं ते म्हणाले.

गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांच्यावरच्या गुन्ह्याची माहिती संबंधित पक्षाची वेबसाइट, वृत्तपत्र आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांवर ३ वेळा प्रसारित करावी लागेल. तसंच समाज माध्यमांवरही द्यावी लागेल, असंही आयोगानं सांगितलं आहे. प्रचारामध्ये कोणत्याही पक्षाला लहान मुलांचा वापर करता येणार नाही असंही आयोगानं स्पष्ट केलं आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निःपक्षपाती पद्धतीने राबवली जाईल, यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं २१०० निरीक्षकांची नेमणूक केली आहे. निवडणुकीतल्या मतदारांच्या सहभागाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधींकडून

**होल्ड व्हाइस कास्ट**

*देशात ९७ कोटी नोंदणीकृत मतदार असून त्यात ४९ कोटी ७० लाख पुरुष आणि ४७ कोटी १० लाख महिलांचा समावेश आहे. २० ते २९ वयोगटातल्या १९ कोटी ८४ लाख मतदारांनी मतदार यादीत नाव नोंदवलं असून त्यापैकी १ कोटी ८० लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. देशात १ हजार पुरुष मतदारांमागे ९४८ महिला मतदार आहेत. मात्र १२ राज्यांमध्ये महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. २०२४ या वर्षात वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या १३ लाख ४ हजार युवकांची नोंदणीही निवडणूक आयोगानं यावेळी केली आहे.*

*देशात ८२ लाखांहून अधिक मतदार ८५ पेक्षा जास्त वयाचे आहेत. १०० पेक्षा जास्त वय असणारे २ लाख १८ हजार मतदार देशात आहेत. तसंच ८८ लाख ४० हजार दिव्यांग नागरिकांनी मतदार म्हणून नोंदणी केली आहे. देशभरातल्या ८५ पेक्षा जास्त वय असलेल्या मतदारांना किंवा ४० टक्क्यांपेक्षा अधिक अपंगत्व*

*असलेल्या दिव्यांग मतदारांना यंदा घरुन मतदान करण्याची सुविधा मिळणार आहे. त्यासाठी त्यांच्या घरापर्यंत १२ डी अर्ज पोहोचवला जाईल, हा अर्ज भरुन देणाऱ्यांना घरुन मतदान करण्याची सोय उपलब्ध असेल. या मतदारांनी मतदान केंद्रात जाऊन मतदान करण्याचा पर्याय निवडला तर त्यांना स्वयंसेवकांमार्फत चाकाची खुर्ची पुरवली जाईल.*

*यंदाच्या निवडणुकांमध्ये साडे १० लाख मतदान केंद्र असणार असून त्यासाठी ५५ लाख मतदान यंत्र वापरली जातील. एका मतदान केंद्रात जास्तीत जास्त १५०० मतदारांचा समावेश असेल. मतदानाच्या प्रक्रियेत यंदा दीड कोटी अधिकारी-कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी सहभागी होणार आहेत.*

**<><><><><>**

राज्यातल्या कापूस, आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भावांतर पद्धतीनं लाभ देण्यासाठी राज्य सरकारनं ४ हजार कोटींची तरतूद केली असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली. राज्य मंत्रिमंडळाची या आठवड्यातली तिसरी बैठक आज झाली. त्यानंतर मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. सगेसोयरे या व्याख्येसंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेवर आलेल्या हरकती आणि सूचनांच्या संदर्भातली कार्यवाही ४ महिन्यात पूर्ण करण्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं. आतापर्यंत सुमारे ४ लाख हरकतींची नोंदणी आणि छाननी पूर्ण झाल्याचं ते म्हणाले. बैठकीत विविध विभागांच्या एकूण सतरा प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. यात मालमत्ता विद्रूपीकरणासाठी आता एक वर्षाचा कारावास आणि दंडाची रक्कम वाढवण्याचा निर्णय झाला. विणकर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ आणि ऑटो रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळाच्या स्थापनेला मंत्रीमंडळानं मान्यता दिली. वृद्ध साहित्यिक, कलाकारांना ५ हजार रुपयांच मानधन, राजपत्रित अधिकारी महासंघाच्या कल्याण

केंद्रासाठी २० कोटींचा अतिरिक्त निधी, राज्यात संस्कृत, तेलुगू, बंगाली साहित्य अकादमींची स्थापना, शासकीय, निमशासकीय जागांवर मोफत चित्रीकरण आणि हाताने मैला उचलण्याच्या प्रथेच्या उच्चाटनासाठी रोबोटिक स्वच्छता यंत्रे असलेली "मॅनहोलकडून मशीनहोल" कडे योजनेला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**<><><><><>**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आज दुपारी मुंबईत दाखल झाली. यात्रेचा हा शेवटचा टप्पा असून प्रियांका गांधी त्यात सहभागी झाल्या आहेत. ही यात्रा म्हणजे निवडणूक रोख्यांमधून भाजपाला मिळालेल्या ६ हजार कोटी रुपयांच्या खंडणीविरोधात ६ हजार किलोमीटरचा सामना आहे असं ते म्हणाले. युवा न्याय, शेतकरी न्याय, महिला न्याय, कामगार न्याय व भागिदारी न्याय अशा पाच न्याय तसंच अन्य २५ बाबींची हमी काँग्रेसने या यात्रेकरवी दिल्याचं त्यांनी सांगितलं. राहुल गांधी उद्या मुंबईत शिवाजी पार्कवर सभेला संबोधित करणार आहेत.

**<><><><><>**

प्रसारभारतीचे अध्यक्ष म्हणून भारतीय सनदी सेवेतले निवृत्त अधिकारी नवनीत कुमार सेहगल यांनी आज पदभार स्वीकारला. सेहगल हे १९८८ च्या तुकडीतले उत्तरप्रदेश केडरचे अधिकारी आहेत.

**//<><><><><>//**